माहितीचा
अधिकार

दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/१३९/२०१८
दि.२६/१०/२०१८.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.

श्री.आदिमुलन कलीयन, ................अपिलार्थी
रा.माता मंदिराजवळ, तिपन्ना नगर (NRC),
पो.मोहने, ता.कल्याण, जि.ठाणे ४२११०२.

जनमाहिती अधिकारी तथा, ................प्रतिवाद
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

## -: विवेचन :-

श्री.आदिमुलन कलीयन यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांचेकडे दि.२४/०८/२०१८ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

१) आपल्या आस्थापनेवरील प्रगलादन राममुर्ती (सफाई कामगार) हे एकुण किती दिवस गैरहजर राहिले? गैरहजेरीचे कारण कोणते, मेडिकल सर्टीफिकेट दिले का? दिले असल्यास कोणाचे, किती दिवसांचे, आपल्या आस्थापनाने सतत गैरहजर राहत असल्यास आपण त्यांच्यावर कोणती शिस्तभंगाची कारवाई केली त्याची सविस्तर माहिती मिळणेसाठी. व सर्व दस्ताऐवजांच्या सत्यप्रतींचा छायांकित प्रती मिळणेसाठी.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**
माहिती अधिकार अंतर्गत दि.२४/०८/२०१८ रोजीच्या पत्रान्वये माहिती देण्यास विलंब झाला असुन तसेच जाणीवपूर्वक टाळाटाळ करीत असल्याने अपिलार्थी अर्जदार यांनी दि.१२/१०/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**
अपिलार्थी अर्जदार व जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.२६/१०/२०१८ रोजी दुपारी ०३.१० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.आस्था/३८४/२०१८ दि.१६/१०/२०१८ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) हे व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद**:- माहिती अधिकार अंतर्गत मला माहिती देण्यास विलंब केला असुन जाणीवपुर्वक टाळाटाळ केली आहे.

२) **जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८ पोटकलम (त्र) अन्वये माहिती उपलब्ध करून देता येत नाही.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

-: **निर्णय** :-

१) शासन परिपत्रक क्रमांक:संकीर्ण २०१२/९८९/प्र.क्र.४७९/सहा, तारीख १७ ऑक्टोबर २०१४ च्या नुसार वैयक्तिक स्वरुपाची माहिती असल्याने अपिलार्थी अर्जदार यांनी अपेक्षिलेली माहिती देता येत नाही. सबब, सदरचे अपिल निकाली काढण्यात येत आहे.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति:-

१) श्री.आदिमुलन कलीयन,
रा.माता मंदिराजवळ, तिपन्ना नगर (NRC),
पो.मोहने, ता.कल्याण, जि.ठाणे ४२११०२.

२) जन माहिती अधिकारी तथा
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना) यांचे कार्यालय.